लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या २८ मार्च रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येईल, तर ३० मार्च ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. बिहारमध्ये मात्र उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २९ मार्च ही आहे.

पहिल्या टप्प्यात १७ राज्यं आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधल्या  १०२ जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यात महाराष्ट्रातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. मतदान १९ एप्रिलला  होणार आहे.

नागपूर लोकसभा मतदार संघामधून भाजपा तसंच महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. रामटेक लोकसभा मतदारसंघातून शिवसेना आणि महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांनी देखील आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज १७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पक्षासोबत असलेल्या जुन्या खासदारांना तसंच गेल्यावेळी पराभूत झालेल्या उमेदवारांना पक्षानं पुन्हा संधी दिली आहे. दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत, ठाण्यातून राजन विचारे, रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून विनायक राऊत, उस्मानाबाद मधून ओमराजे निंबाळकर आणि परभणीतून संजय जाधव पुन्हा पक्षाचे उमेदवार असतील. गेल्यावेळी पराभूत झालेल्या चंद्रकांत खैरे यांना औरंगाबादमधून, संजय दिना पाटील यांना ईशान्य मुंबईतून, आणि अनंत गीते यांना रायगडमधून पक्षानं पुन्हा संधी दिली. वायव्य मुंबई मतदारसंघातले खासदार गजानन किर्तीकर एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेल्यानं

त्यांचा मुलगा अमोल किर्तीकर यांना पक्षानं तिकीट दिलं आहे. गेल्यावेळी शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले होते. त्यातल्या मुंबई दक्षिण मध्य, नाशिक, बुलडाणा, हिंगोली, शिर्डी, यवतमाळ-वाशिम, मावळ या मतदारसंघातले खासदार एकनाथ शिंदे यांच्यासोबत असल्यानं पक्षानं इथून नव्या उमेदवारांना संधी दिली आहे.

दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई, नाशिकमधून राजाभाऊ वाजे, बुलडाण्यातून नरेंद्र खेडेकर, हिंगोलीतून नागेश पाटील-आष्टीकर, शिर्डीतून भाऊसाहेब वाकचौरे, यवतमाळ-वाशिम मधून संजय देशमुख आणि मावळमधून संजोग वाघेरे-पाटील हे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे उमेदवार असतील. सांगलीमधून पक्षानं चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. शिवसेनेच्या यादीवर काँग्रेसनं नाराजी व्यक्त केली आहे. मुंबईतल्या काही जागा, सांगली यावर चर्चा सुरू असताना उमेदवारी जाहीर करणं योग्य नसल्याची प्रतिक्रिया काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी पक्षानं ९ उमेदवार जाहीर केले आहेत. अकोल्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर काल झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय झाल्याचं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी बातमीदारांना सांगितलं. आगामी निवडणुकीत ओबीसी समुदायाबरोबर आघाडी होईल, तसंच मुस्लिम आणि जैन समुदायालाही उमेदवारी दिली जाईल असं ते म्हणाले. वंचित बहुजन आघाडीचा रामटेकचा उमेदवार आज दुपारी ४ वाजता घोषित केला जाईल, असं त्यांनी सांगितलं.  सांगलीमध्ये ओबीसी बहुजन पार्टीतर्फे प्रकाश शेंडगे उभे राहिले तर त्यांना पाठिंबा देऊ तसंच नागपूर मधल्या काँग्रेसच्या उमेदवाराला वंचितनं समर्थन जाहीर केल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. बाकी जागांची अंतिम यादी २ एप्रिलपर्यंत जाहीर होईल असं ते म्हणाले.

<><><><><>

सिमी, अर्थात स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया या संघटनेवरची बंदी कायम असून, या बंदीबाबत कुणाला हरकत असेल तर त्यांनी ती नोंदवावी असं बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक न्यायाधीकरणानं कळवलं आहे. येत्या ९ एप्रिलपर्यंत कोर्ट रुमनंबर १६, दिल्ली उच्च न्यायालय, शेर शाहा रोड, नवी दिल्ली - ११०५०३ या पत्त्यावर हरकत नोंदवता येईल.

या संघटनेवर २००१ मधे आणि त्यानंतर २०१९ मधे पाच वर्षाकरता बंदी घातली होती. २९ जानेवारी २०२४ पासून ही बंदी आणखी पाच वर्षांसाठी वाढवली आहे.

<><><><><>

सियुईटी- युजी- २०२४ साठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ मार्चपर्यंत वाढवली आहे. उमेदवार आणि इतर संबंधितांच्या विनंतीनंतर हा निर्णय घेतल्याची माहिती युजीसीचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी दिली. ही परीक्षा ३८० शहरांमध्ये घेतली जाणार असून यामध्ये भारताबाहेरच्या २६ शहरांचा समावेश आहे.

<><><><><>

भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी सदानंद दाते यांची NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे. १९९० च्या तुकडीचे  भारतीय पोलीस सेवेतले हे अधिकारी सध्या महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं दाते यांच्या नियुक्तीला ३१ डिसेंबर २०२६  पर्यंत अर्थात त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंतच्या कार्यकाळापर्यंत मान्यता दिल्याचं कार्मिक मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

यंदाच्या मार्च महिन्यात भारतानं आशियाई बाजारांमध्ये सर्वाधिक परदेशी गुंतवणुक आकर्षित केली आहे. परदेशी  गुंतवणूकदारांनी डिसेंबर २०२३ नंतर केलेल्या  सर्वात मोठ्या खरेदीत भारतीय समभागांमध्ये ३ अब्ज ६३ कोटी डॉलर्सची गुंतवणूक केली. तर देशांतर्गत गुंतवणूकदारांनी गेल्या चार वर्षांचा उच्चांक नोंदवत सुमारे ५२ हजार ४६७ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. जागतिक भू-राजकीय आव्हानं आणि चढे  व्याजदर आणखी काही काळ कायम राहण्याची चिंता, या पार्श्वभूमीवर हे यश उल्लेखनीय ठरलं आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनराइजर्स हैदराबाद आणि मुंबई  इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर आज संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

चेन्नईच्या एम ए चिदंबरम मैदानावर काल झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जनं गुजरात टायटन्सचा ६३ धावांनी पराभव केला. २०७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टायटन्सचा संघ निर्धारित २० षटकांत ८ बाद १४३ धावांवर आटोपला.

**<><><><>**

छत्तीसगड राज्यातल्या  आदिवासी बस्तर विभागात आज सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत दोन महिला बंडखोरांसह एकूण सहा माओवादी ठार झाले. केंद्रीय राखीव पोलीस दल, कोब्रा बटालियन आणि जिल्हा राखीव रक्षकांचं संयुक्त पथक विजापूर जिल्ह्यातल्या बासागुडा भागातल्या  जंगलात शोध मोहिमेवर असताना  चिपूरभट्टीजवळ ही  चकमक झाल्याची माहिती आमच्या

वार्ताहरानं दिली. घटनास्थळावरून सहा माओवाद्यांचे मृतदेह, शस्त्रात्रांचा मोठा साठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला असून, या परिसरात अद्यापही शोध मोहीम सुरु असल्याचं स्थानिक पोलिसांनी सांगितलं.